# प्रसिध्दीसाठी

पिंपरी ४ मार्च :- प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत चऱ्होली, रावेत व बोऱ्हाडेवाडी येथील प्रकल्पातील सदनिकांची ऑनलाईन संगणकीय सोडत दि.२७/०२/२०२१ रोजी काढण्यात आलेली असून या सोडतीमध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या मुळ कागदपत्रांची तपासणी मोहिम सोमवार दि.०८ मार्च २०२१ पासून सुरु करण्यात येणार असल्याने, सदर लाभार्थ्यांनी झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागात मुळ कागदपत्रांसह उपस्थित रहावे असे आवाहन महापौर उषा उर्फ माई ढोरे, पक्षनेते नामदेव ढाके व आयुक्त राजेश पाटील यांनी केले आहे.

या सोडतीमध्ये विजेता झालेल्या लाभार्थ्यांनी मुळ (Original) कागदपत्रे उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र, बँक पासबुक, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान ओळखपत्र, रहिवाशी दाखला, भाडे करारनामा इ. व नियमानुसार इतर आवश्यक कागदपत्रांची मागणी महापालिकेने केल्यास लाभार्थ्यांना ते सादर करावे लागतील.

तसेच लाभार्थ्यांनी अर्जा सोबत सादर केलेले उत्पन्नाचा दाखला याची तपासणी होणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांची महापालिका हद्दीत कोणतीही मिळकत नाही याची देखील तपासणी होणे आवश्यक राहील. ज्या राखीव प्रवर्ग मध्ये अर्जदार यांनी अर्ज सादर केला आहे त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्राची तपासणी करणेत येईल. या मुळ निकषाची पुर्तता झालेस त्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल. निकष पुर्तता झाली नसल्यास त्या लाभार्थ्यांना अपात्र ठरविणेत येऊन त्या त्या जागेवर प्रतिक्षा यादीतील प्रवर्ग निहाय लाभार्थ्यांस योजनेत समावुन घेणेत येईल.

जागतिक महामारी कोविड-१९ चा प्रादुर्भाव असल्यामुळे सद्यस्थितीत खालीलप्रमाणे आरक्षणनिहाय नियोजन करुन लाभार्थ्यांना कागदपत्रांची तपासणी करणेकामी बोलविण्यात येणार आहे.

रावेत प्रकल्पासाठी ९३४ लाभार्थ्यांची निवड झालेली असून त्यांनी खाली दिलेल्या वेळेनुसार कागदपत्रे तपासणीकामी झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागात उपस्थित रहावे असेही आवाहन करणेत येत आहे.

- दिनांक ०८ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी १ वाजता – अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.८६९ ते ९३४ पर्यंत)
- दिनांक ०८ मार्च २०२१ – दुपारी २.३० ते दुपारी ५.३० वाजता – अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.७४८ ते ८६८ पर्यंत)
- दिनांक ०९ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – इतर मागास प्रवर्ग (OBC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.४६८ ते ६०८ पर्यंत)

- दिनांक १० मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – इतर मागास प्रवर्ग (OBC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.६०९ ते ७४७ पर्यंत)
- दिनांक १२ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता –सर्वसाधारण प्रवर्ग (General Category) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.१ ते १५५ पर्यंत)
- दिनांक १३ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता –सर्वसाधारण प्रवर्ग (General Category) प्रवर्गातील लाभार्थी(निवड यादीतील अ.क्र.१५६ ते ३१० पर्यंत)
- दिनांक १४ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता –सर्वसाधारण प्रवर्ग (General Category) प्रवर्गातील लाभार्थी(निवड यादीतील अ.क्र.३११ ते ४६७ पर्यंत)

बोऱ्हाडेवाडी प्रकल्पासाठी १२८८ लाभार्थ्यांची निवड झालेली असून त्यांनी खाली दिलेल्या वेळेनुसार कागदपत्रे तपासणीकामी झोपडपट्टी निर्मुलन वपुनर्वसन विभागात उपस्थित रहावे असेही आवाहन करणेत येत आहे.

- दिनांक १५ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.११९८ ते १२८८ पर्यंत)
- दिनांक १६ मार्च २०२१ –सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.१०३१ ते ११९७ पर्यंत)
- दिनांक १७ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – इतर मागास प्रवर्ग (OBC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.६४५ ते ८३८ पर्यंत)
- दिनांक १८ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – इतर मागास प्रवर्ग (OBC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.८३९ ते १०३० पर्यंत)
- दिनांक १९ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – सर्वसाधारण प्रवर्ग (General Category) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.१ ते २१५ पर्यंत)
- दिनांक २० मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – सर्वसाधारण प्रवर्ग (General Category) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.२१६ ते ४३० पर्यंत)
- दिनांक २१ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – सर्वसाधारण प्रवर्ग (General Category) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.४३१ ते ६४४ पर्यंत)

चऱ्होली प्रकल्पासाठी १४४२ लाभार्थ्यांची निवड झालेली असून त्यांनी खाली दिलेल्या वेळेनुसार कागदपत्रे तपासणीकामी झोपडपट्टी निर्मुलन वपुनर्वसन विभागात उपस्थित रहावे असेही आवाहन करणेत येत आहे.

- दिनांक २२ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.१३४२ ते १४४२ पर्यंत)
- दिनांक २३ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.११५५ ते १२४७ पर्यंत)
- दिनांक २४ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.१२४८ ते १३४१ पर्यंत)
- दिनांक २५ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – इतर मागास प्रवर्ग (OBC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.७२२ ते ८६६ पर्यंत)
- दिनांक २६ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – इतर मागास प्रवर्ग (OBC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.८६७ ते १००९ पर्यंत)
- दिनांक २७ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – इतर मागास प्रवर्ग (OBC) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.१०१० ते ११५४ पर्यंत)
- दिनांक २८ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – सर्वसाधारण प्रवर्ग (General Category) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.१ ते १८० पर्यंत)
- दिनांक २९ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – सर्वसाधारण प्रवर्ग (General Category) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.१८१ ते ३६१ पर्यंत)
- दिनांक ३० मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – सर्वसाधारण प्रवर्ग (General Category) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.३६२ ते ५४१ पर्यंत)
- दिनांक ३१ मार्च २०२१ – सकाळी ११ ते दुपारी ५ वाजता – सर्वसाधारण प्रवर्ग (General Category) प्रवर्गातील लाभार्थी (निवड यादीतील अ.क्र.५४२ ते ७२१ पर्यंत)